Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

जानेवारी - २०२६ | एकोणावीसावा अंक

## व्होकेशनल अवॉर्ड विशेषांक

ROTARY VOCATIONAL EXCELLENCE AWARDS



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Dr.Dinesh Soni



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

रोटरी इंटरनॅशनलच्या सेवाक्षेत्रांमध्ये व्होकेशनल सेवा ही अत्यंत मूलभूत आणि प्रभावी सेवा आहे. कारण प्रत्येक व्यवसाय, उद्योग किंवा कौशल्य हे केवळ आर्थिक प्रगतीचे साधन नसून, ते समाजाच्या मूल्यव्यवस्थेचे प्रतिबिंब असते. व्यावसायिक उत्कृष्टतेसोबत सामाजिक बांधिलकी जपणेहाच व्होकेशनल सेवेचा गाभा आहे.व्होकेशनल ॲवार्ड म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या यशाचा सन्मान नसून, तो प्रामाणिक श्रम, नैतिक मूल्ये, सामाजिक संवेदनशीलता आणि व्यावसायिक प्रामाणिकतेचा गौरव आहे. आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट काम करताना समाजासाठी काहीतरी देण्याची जाणीव ठेवणाऱ्या व्यक्ती या पुरस्काराच्या खऱ्या मानकरी आहेत.आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान काळात व्यवसाय करताना मूल्ये जपणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत रोटरीचा फोरवे टेस्ट हा उपक्रम प्रत्येक व्यावसायिकासाठी दिशादर्शक ठरतोहे सत्य आहे का ? हे सर्वांसाठी न्याय्य आहे का ? यामुळे सद्भावना व मैत्री वाढेल का ? हे सर्वांच्या हिताचे ठरेल का ?या तत्त्वांवर आधारित व्यावसायिक कार्यच समाजात दीर्घकालीन विश्वास निर्माण करते.रोटरी दिशा व्होकेशनल ॲवार्ड विशेषांक या अंकाच्या माध्यमातून आपण अशाच मूल्याधिष्ठित व्यावसायिक व्यक्तिमत्त्वांचा गौरव करीत आहोत. त्यांच्या जीवनप्रवासातून युवकांना प्रेरणा मिळेल, उद्योजकांना दिशा मिळेल आणि समाजात नैतिक व्यावसायिकतेचे महत्त्व अधिक ठळकपणे अधोरेखित होईल.अतिथी संपादक म्हणून ही संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे. यासाठी मी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष, सचिव, व्होकेशनल सेवा समिती, संपादकीय संघ तसेच सर्व रोटेरियन बांधवांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सहकार्यामुळेच हा विशेषांक अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण बनला आहे.चला, आपण सर्वजण आपल्या-आपल्या व्यवसायातून समाजासाठी सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. सेवा, प्रामाणिकपणा आणि मूल्ये यांचा संगम साधत, रोटरीच्या व्होकेशनल सेवेचा संदेश अधिक व्यापक पसरवूया.

रो.डॉ.दिनेश सोनी
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- राष्ट्रगीताने मिटींग ची सुरुवात झाली.
- फोरवे टेस्ट चे वाचन सामुहिकरीत्या झाले.
- मागील मिटींग चे वाचन सचिव पवन मालपानी यांनी केले..
- अध्यक्षांनी सर्व सभासदांचे मनःपूर्वक स्वागत केले.
- जास्तीत जास्त सभासदांनी कॉन्फरन्स साठी रजिस्ट्रेशन करावे असे आवाहन अध्यक्षांनी केले.
- सलगरा येथे पार पडलेल्या हेल्थ चेकअप कॅम्प प्रोजेक्ट ची माहिती अध्यक्ष यांनी सांगितले
- क्लब रोस्टर बद्दल माहिती रो. प्रशांत भाटगावे यांनी दिली.
- व्होकेशनल एक्सलन्स अवार्ड ची माहिती रो. दिनेश सोनी यांनी दिली. एकुण २० नॉमिनेशन. आले त्यापैकी ४ नावे विष्णु मदने, उमेश गायकवाड, पुजा तापडीया, प्रविण शिवणगीकर यांची निवट झाल्याचे सांगितले.
- डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्सची माहिती रो. रवि जोशी यांनी दिली.
- सुमित जी दाड यांचे पेन देऊन स्वाहत करण्यात आले.
- क्लब कॅलेंडर ची माहिती अध्यक्षांनी दिली.
- क्लब बुलेटिन : साप्ताहिक रोटरी दिशा चे अनावरण मा. अध्यक्ष रवि जोशी व अध्यक्ष , सचिव, हस्ते करण्यात आले. अतिथी संपादक म्हणून रो. गणेश सावंत यांनी कार्य केले. त्यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले.
- नविन बीओडी मेम्बर्स चे फुल देऊन स्वागत करण्यात आले.
- अध्यक्षांनी नविन बीओडीस शुभेच्छा दिल्या.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली.

Man of The Meeting



Rtn.Umesh Patrawale

1st Come in the Hall





Rtn.Dr.Dinesh Soni

# रोटरी व्होकेशनल अवॉर्ड का दिला जातो

रोटरी व्होकेशनल अवार्ड का दिला जातो? रोटरी इंटरनॅशनलच्या पाच प्रमुख सेवा क्षेत्रांपैकी व्होकेशनल सेवा हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत सेवा क्षेत्र आहे. प्रत्येक व्यवसाय, उद्योग किंवा कौशल्य हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, ते समाजाच्या उन्नतीचे प्रभावी माध्यम आहेया विचारावर रोटरीचा विश्वास आहे.याच भूमिकेतून रोटरी व्होकेशनल अवार्ड दिला जातो. व्होकेशनल अवार्ड देण्यामागील मुख्य उद्दिष्टे (१) व्यावसायिक उत्कृष्टतेचा सन्मानआपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट, गुणवत्तापूर्ण आणि जबाबदारीने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे, हा या पुरस्काराचा पहिला उद्देश आहे. (२) नैतिक मूल्यांना प्रोत्साहन आजच्या स्पर्धात्मक युगात नीतिमूल्ये जपत व्यवसाय करणे हे मोठे आव्हान आहे. सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. (३) समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींची ओळखज्या व्यक्ती आपल्या व्यवसायातून समाजासाठी सकारात्मक योगदान देतातरोजगार निर्मिती, सेवा, कौशल्य विकास, सामाजिक उपक्रम अशा व्यक्तींना समाजासमोर आदर्श म्हणून उभे करणे, हा या पुरस्काराचा महत्त्वाचा हेतू आहे. (४) फोरवे टेस्टचा प्रसार रोटरीचा फोरवे टेस्ट.. हे सत्य आहे का? हे सर्वांसाठी न्याय्य आहे का?यामुळे सद्भावना व मैत्री वाढेल का? हे सर्वांच्या हिताचे ठरेल का? या तत्त्वांवर आधारित व्यावसायिक आचरणाला प्रोत्साहन देणे हा व्होकेशनल अवार्डचा मूलगामी उद्देश आहे. (५) युवकांसाठी प्रेरणास्थान निर्माण करणे हा पुरस्कार युवक, विद्यार्थी, उद्योजक आणि नवोदित व्यावसायिकांसाठी प्रेरणादायी ठरतो. मूल्याधिष्ठित यश शक्य आहे, हा विश्वास त्यातून निर्माण होतो. रोटरी व्होकेशनल अवार्डचे वैशिष्ट्य हा पुरस्कार केवळ आर्थिक यशासाठी दिला जात नाही कोणत्याही एका व्यवसायापुरता मर्यादित नसतो डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, उद्योजक, कारागीर, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, कामगार अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींना दिला जातो पुरस्कारामागे सेवा, मूल्ये आणि समाजहित हे केंद्रस्थानी असते


## व्होकेशनल अवॉर्डचे मानकरी












## नेशन बिल्डर अवॉर्डचे मानकरी









## Rotary Mid Town this Week  Photo Gallery










## Rotary Mid Town Adishakti this Week Photo Gallery







